# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल.

दिनांक 25 जानेवारी 2020

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती. यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन व्याख्यान दिनांक 25 जानेवारी 2020 रोजी आयोजित केले होते. या व्याख्यानासाठी मुख्य वक्ते म्हणून डॉ. महेंद्र कदम. प्राचार्य, विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी. हे लाभले होते. "भाषा आणि बोली यांचा अनुबंध" असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. त्यांनी मानवी भाषेचे वेगळेपण सांगून त्या भाषेमुळेच मानव स्वतःची इतरांपेक्षा प्रगती करू शकला. असे प्रतिपादन केले. ज्याप्रमाणे कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते. त्याप्रमाणे कोणतीही भाषा आणि तिच्या बोली यात श्रेष्ठ कनिष्ठत्व नसते. बोली मुळे प्रमाणभाषा समृद्ध होते .बोली आणि प्रमाणभाषा यात शब्द,वाक्य व त्यांचे अर्थ यांची देवघेव चालू असते. प्रमाण भाषेबरोबरच बोलीभाषा ही वापरता येणे आवश्यक आहे .असा विचार त्यांनी मांडला.

अध्यक्षीय भाषणात माननीय प्राचार्यांनी सांगितले की, जगातील सर्व प्रमुख भाषा आणि समाज यांच्यात मराठी भाषा आणि मराठी समाज यांचा समावेश आहे. मराठी भाषा व्यावहारिक दृष्टीने उन्नत करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे मत त्यांनी मांडले. या ऑनलाईन व्याख्यानाचा लाभ 43 विद्यार्थ्यांनी घेतला.

आपल्या माहितीसाठी अहवाल सादर.

Memadek

मराठी विभाग प्रमुख

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

## मराठी विभाग

## आयोजित

## जागतिक मराठी भाषा गौरव दिना निमित्त 'मराठी भाषा प्रश्न मंजुषा स्पर्धा'

## अहवाल

---

कविवर्य कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस 27 फेब्रुवारी हा आपण मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करतो. यावर्षी कोविड 19 च्या प्रादुर्भावामुळे असाधारण परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील मराठी विभागाने ऑनलाइन प्रश्नमंजुषा घेण्याचे आयोजन केले. त्यानुसार मराठी साहित्य, मराठी भाषा,मराठी संस्कृती या संदर्भातील एकूण 20 प्रश्न तयार करून ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले. या प्रश्नमंजुषेला भरघोस प्रतिसाद मिळाला. या प्रश्नमंजुषेमध्ये 1176 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सर्व सहभागी स्पर्धकांना (e-certificate) त्यांच्या मेलवर पाठविण्यात आले. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे लेखक ,लेखकांची पुस्तके, ज्ञानपीठ पारितोषिक विजेते लेखक, मराठीतील प्रथम साहित्यकृती , मराठी संस्कृती यावर चिंतन करून प्रश्नमंजुषा सोडवल्या.

या प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील विविध विद्यापीठात असणारे प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. पुणे ,नागपूर ,मुंबई, कोल्हापूर ,उत्तर महाराष्ट्र या विद्यापीठातून सहभाग नोंदवला. या सर्व सहभागींना त्यांच्या मेलवर सर्टीफिकीट पाठवण्यात आले.

आपल्या माहितीसाठी अहवाल सादर!

स्पर्धा समन्वयक

मराठी विभाग प्रमुख